# नगर परिषद कार्यालय,मलकापूर

प्रशासकीय सभादिनांक 25/08/2022

## कार्यवृत्त

आज दिनांक 25/08/2022 रोजी सकाळी 11 वाजता मा.प्रशासक महोदय,नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या पाणी पुरवठा विभाग,बांधकाम विभाग,मिळकत विभाग,आरोग्य विभाग व लेखा विभाग मलकापूर,सुवर्ण जयंती यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरीता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

1. श्री भाऊसाहेब रामदास सरदार यांचे मलकापूर ते धुपेश्वर सिमेंट चेयर भरणा केलेली रक्कम परत करण्याबाबत पुनश्च विचार विनिमय करणे.
2. आमदार निधी अंतर्गत मंजूर कामांबाबत.विचार विनिमय करुन निर्णय घेणे.
3. आरक्षण क्रमांक 73 सर्व्हे नं.3 वरील छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक सभागृह व व्यापारी संकुलासाठी श्री.राजेंद्र वाडेकर यांनी दि.25/7/2022 च्या पत्रात नमुद केलेल्या व्यवस्था करणेबाबत निर्णय घेणे.
4. न.प.मालकीच्या सर्व्हे नं.3 आरक्षण क्र.73 वरील छत्रपती शिवाजी महाराज बहुउद्देशिय सभागृह व व्यापारी संकुलाचे संबधी भाडे निश्चीती करुन भाडे तत्वावर देण्याबाबत निर्णय घेणे
5. बुलडाणा रोडवरील व आठवडी बाजार मधील दुकान गाळयांची करारनाम्यातील अटीप्रमाणे व स्थायी निर्देशातील तरतुदीप्रमाणे भाडेवाढ करण्यास मान्यता देणे.
6 मा.आमदार स्थानिक विकास निधीमधून प्राप्त रुग्णवाहिकेवर तात्पुरत्या स्वरुपात नेमण्यात आलेल्या चालकांकडून करुन घेण्यात आलेल्या कामास कार्योत्तर मंजूरात देणे.
7. आयकर/वस्तु व सेवा कराचे TDS भरणा करीता C/A CS ची नियुक्ती करणेबाबत निर्णय घेणे.
8. दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीवीका अभियान अंतर्गत महिला बचत गटाने तयार केलेल्या उत्पादित वस्तुंच्या विक्रीसाठी तसेच शहरातील बेरोजगार कारागीर/कामगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी शहर उपजीवीका केंद्र न.प.च्या जागेवर सुरु करण्याबाबत निर्णय घेणे.

विषय क्र.1. :- श्री भाऊसाहेब रामदास सरदार यांचे मलकापूर ते धुपेश्वर सिमेंट चेयर भरणा केलेली रक्कम परत करण्याबाबत पुनश्चः विचार विनिमय करणे.



Scanned by Scanner Go

श्री भाऊसाहेब रामदास सरदार यांचे मलकापूर ते धुपेश्वर सिमेंट चेयर भरणा केलेली रक्कम परत करण्याबाबत पुनश्चः विचार विनिमय करण्याबाबतच्या पाणी पुरवठा अभियंता यांच्या विषयावरील मा.मुख्याधिकारी,नगर परिषद मलकापूर यांचे टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,मलकापूर ते धुपेश्वर जूनी लोखंडी पाईप लाईनच्या जुन्या सिमेंट चेयर बाबत पाणी पुरवठा विभागा मार्फत रुपये 68000/- चे मुल्यांकन काढण्यात आले असून त्यासाठी दिनांक 06/05/2021 रोजीच्या दैनिक अजिंक्य भारत या वर्तमानपत्रात कामास प्रसिध्दी देण्यात आलेली असून त्यात श्री संजय रामदास सरदार रा.भिमनगर यांनी सर्वात जास्त रक्कम रुपये 2,11,000/-एवढी बोली लावली होती.त्यांचे दर हे नगर पालिका हिताचे असल्यामुळे स्थायी समिती दिनांक 25/05/2022 रोजी त्यास स्थायी समितीने मंजूरी दिली आहे.स्थायी समितीच्या वित्तीय मंजूरीनुसार त्यांना दिनांक 23 जून 2021 रोजी काम सूरू करण्याबाबत आदेश देण्यात आलेला असून दिनांक 07/07/2021 रोजी काम सुरु न केल्यास रक्कम जप्त करण्याबाबत ताकीद नोटीससुध्दा देण्यात आलेली आहे.

नगर पालिकेच्या नोटीस ला जबाब म्हणून दिनांक 8 जूलै 2021 ला श्री सरदार यांनी ते आजारी असून काम करण्यास असमर्थ असून भरलेली रक्कम वापस करण्याची विनंती अर्ज दाखल केला आहे.त्यांचा अर्ज स्थायी समिती दिनांक 30/08/2021 रोजी मध्ये चर्चा अंती सन्माननीय सदस्य यांनी जिल्हा प्रशासन अधिकारी,बुलडाणा यांचे मार्गदर्शन घेऊन योग्यतो निर्णय घ्यावा असे कळविले आहे.

स्थायी समितीच्या निर्णयानुसार मा.जिल्हा प्रशासन अधिकारी,बुलडाणा यांचे दिनांक 21 जुलै 2022 ला नगर पालिकेला पत्र प्राप्त झाले असून त्यात त्यांनी नगर पालिका स्तरावर निर्णय घेऊन नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे.पाणी पुरवठा विभाग कर्मचारी यांचे पाहणी अहवालानुसार राष्ट्रीय महामार्ग कामात बऱ्याच चेयर काढण्यात आलेल्या असून गत एक वर्षापासून कंत्राटदार यांनी काम न केल्यामुळे 70% चेयर जागेवर नाही आहेत.

कंत्राटदार यांच्यावर करावयाच्या कारवाईबाबत महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण05/06/प्र.क्र.53/इमा-2 मंत्रालय,मुंबई दिनांक 28/09/2006 मध्ये कंत्राटदार यांचेवर दंडात्मक कार्यवाही बाबत सूचना देण्यात आलेल्या असून त्यात कार्यवाहीचे खालील प्रकार आहे.



Scanned by Scanner Go

1. ताकीद
2. पदावनती
3. नोंदणी रद्द करणे.
4. काळया यादीत टाकणे

श्री.भाऊसाहेब सरदार यांचेकडे कोणत्या प्रकारची नोंदणी नसून उपरोक्त कामासाठी नोंदणीची गरज नसल्यामुळे कार्यवाही क्र.1 ते 3 लागू होत नसून कार्यवाही क्र.4 नुसार भविष्यात इतर ठेकेदार यांनी या प्रकारची वर्तणूक करू नये म्हणून त्यांना त्यांचेकडून त्यांची भरलेली बयाना रक्कम रुपये 1500/- जप्त करणे तसेच 70% चेयर रक्कम 47600/- व जाहिरात खर्च रुपये 5000/- असे एकूण 52600/- रक्म कपात करुन त्यांना नगर पालिका मलकापूर काळया यादीत समाविष्ट करणे योग्य राहील असा अहवाल पाणी पुरवठा अभियंता यांनी सादर केला असल्याचे मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले.

वरील सर्व बाबींचा विचार करता पाणी पुरवठा अभियंता,नगर परिषद मलकापूर यांनी सादर केलेल्या अहलवानुसार कार्यवाही करण्यास ही सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.

विषय क्र.2. :- आमदार निधी अंतर्गत मंजूर कामांबाबत.विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

आमदार निधी अंतर्गत मंजूर कामांबाबत.विचार विनिमय करुन निर्णय घेणे बाबत. विषयाची नगर अभियंता यांचे अहवालावरील मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली. ठरविण्यात येते की मा.सहा ा य्यक अभियंता श्रेणी-1 सा.बां.उपविभाग,मलकापूर यांचे पत्र क्र.846/तां./2022,847/तां/2022 व 845/तां 2022 दिनांक 29/06/2022 नुसार मंजूर झ ालेल्या (मा.आमदार निधी) कामांसाठी निधी विषयक कार्यवाही करण्यासाठी प्रमाणपत्रे व ठरावाची कागदपत्रांची पूर्तता करुन सादर करण्याबाबत कळविले आहे.ती कामे खालील प्रमाणे.

1. मलकापूर न.प.हद्दीतील अशोक नगर येथे मोकळया जागेवर सभागृहाचे बांधकाम करणे. रक्कम रुपये 10 लक्ष
2. मलकापूर न.प.हद्दीतील रामदेवबाबा नगर येथे सभागृहाचे बांधकाम करणे. रक्कम रुपये 10. लक्ष



Scanned by Scanner Go

3. मलकापूर न.प.हद्दीतील जाधववाडी भागात हनुमान मंदीरासमोर सभागृहाचे बांधकाम करणे. रक्कम रुपये 10 लक्ष

अनुक्रमांक 1 व 3 मध्ये दर्शविलेली जागा ही न.प. मालकीची असून अनु क्र.3मध्ये दर्शविलेली जागा ही खाजगी मालकीची असल्याने मालकाकडून दानपत्र करुन घ्यावे लागेल व तद्नंतरच पूढील कार्यवाही करण्यास हरकत नाही.अनु.क्र.1 व 2 मधील कामांकरीता ना-हरकत देण्यास हरकत नाही.असा अहवाल नगर अभियंता बांधकाम यांनी सादर केला असल्याचे मुख्याधिकारी न.प.मलकापूर यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले.

वरील सर्वबाबींचा विचार करता काम क्र. 1 व 2 करीता नाहरकत देण्यास हि सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.

विषय क्र.3. :- आरक्षण क्रमांक 73 सर्व्हे नं.3 वरील छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक सभागृह व व्यापारी संकुलासाठी श्री.राजेंद्र वाडेकर यांनी दि.25/7/2022 च्या पत्रात नमुद केलेल्या व्यवस्था करणेबाबत निर्णय घेणे.

आरक्षण क्रमांक 73 सर्व्हे नं.3 वरील छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक सभागृह व व्यापारी संकुलासाठी श्री.राजेंद्र वाडेकर यांनी दि.25/7/2022 च्या पत्रात नमुद केलेल्या व्यवस्था करणेबाबत नगर अभियंता बांधकाम विभाग यांच्या विषयावरील मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, नगर परिषद हद्दीतील व मालकीच्या सर्व्हे नं.3 आरक्षण क्रमांक 73 वरील छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक सभागृह व व्यापारी संकुलासाठी खालील व्यवस्था करणे अत्यंत आवश्यक असल्याचे तसेच सदर सभागृहाचे बरेचशे कामे निधी अभावी खोळंबलेली असून सभागृहाचे कामकाज ठप्प झाले असल्याचे त्यामुळे सभागृह परि.ामध्ये बाहेरील व्यक्ती येवून दारु पिणे व गैरकायदेशीर कामे करण्यासाठी उपयोग करीत असून मोकाट गुरेढोरे परिसरात मुक्तसंचार करीत आहे,तसेच बांधरुम व स्नानगृहातील नळचोरीला गेले,स्लाईडींग खिडक्यांचे काच फोडण्यात आले आहेत यामुळे सभागृहाला व व्यापारी संकुलाला भग्न अवस्थेचे स्वरुप येत असून अनुचीत प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे श्री.राजेंद्र वाडेकर यांनी दि.25/7/2022 च्या पत्रात नमुद केलेले आहे.सदर ठिकाणी खालील कामे करणे आवश्यक असल्याचेही नमुद केले आहे.



Scanned by Scanner Go

1. न.प.मालकीच्या सर्व्हे नं.3 आरक्षण क्र.73 वरील छत्रपती शिवाजी महाराज सभागृह व व्यापारी संकुलासाठी उच्चदर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे.

2. न.प.मालकीच्या सर्व्हे नं.3 आरक्षण क्र.73 वरील छत्रपती शिवाजी महाराज सभागृह व व्यापारी संकुलासाठी परिसरामध्ये प्रकाश व्यवस्था करणे.

3. न.प.मालकीच्या सर्व्हे नं.3 आरक्षण क्र.73 वरील छत्रपती शिवाजी महाराज सभागृह व व्यापारी संकुलाची 24 तास देखरेख करण्यासाठी कायमस्वरूपी चौकीदाराची व्यवस्थाकरणे.

4. न.प.मालकीच्या सर्व्हे नं.3 आरक्षण क्र.73 वरील छत्रपती शिवाजी महाराज सभागृह व व्यापारी संकुलासाठी असणाऱ्या शौचालय व स्नातगृह,सभागृह व परिसराची नियमीत साफसफाई करणे.

5. शिवाजी नगर प्रभागातील सुभाषचंद्र वोस भागातील न.प.मालकीच्या अंगणवाडीच्या छताची वॉटर प्रुफींग करणे.

वरील सर्व कामांचे स्थळ निरीक्षण करुन सदर कामे करणे आवश्यक असल्याचे नगर अभियंता यांनी अहवालात नमुद केले आहे.त्यानुसार मा.मुख्याधिकारी यांनी सदर वावत सभेच्या निदर्शनास आणून दिली.

वरील सर्ववावींचा विचार करता न.प.मालकीच्या सर्व्हे नं.3 आरक्षण क्र.73 वरील छत्रपती शिवाजी महाराज सभागृह व व्यापारी संकुलासाठी अनुक्रमांक 1 ते 4 ची कामे करण्यास तसेच अनुक्रमांक 5 ची कामे वैशिष्टयपूर्ण योजना,नगरोत्थान,आमदार निधी,खासदार निधी,न.प.निधी,15 वा वित्त आयोग इत्यादी निधी मधून करण्यास ही सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.

विषय क्र.4. :- न.प.मालकीच्या सर्व्हे नं.3 आरक्षण क्र.73 वरील छत्रपती शिवाजी महाराज बहुउद्देशिय सभागृह व व्यापारी संकुलाचे संबधी भाडे निश्चीती करुन भाडे तत्वावर देण्याबाबत निर्णय घेणे

न.प.मालकीच्या सर्व्हे नं.3 आरक्षण क्र.73 वरील छत्रपती शिवाजी महाराज बहुउद्देशिय सभागृह व व्यापारी संकुलाचे संबधी भाडे निश्चीती करुन भाडे तत्वावर देण्याबाबत सहा.मिळकत व्यवस्थापक न.प. यांच्या विषयावरील मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभे समोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,नगर परिषद मालकीच्या सर्व्हे नं.3 आरक्षण क्र.73 वरील छत्रपती शिवाजी महाराज बहुउद्देशिय सभागृह व व्यापारी संकुलाचे संबधी भाडे निश्चिती करुन भाडेतत्वावर देण्यासाठी श्री.राजेद्र वाडेकर यांनी पत्र आवक क्रमांक 2800 दि.04/08/2022 रोजी अर्ज प्राप्त झाला असून संबधीत प्रकरणी वांधकाम विभागाकडून अहवाल मागवावा लागेल



Scanned by Scanner Go

तद्नंतर नगर रचनाकार यांच्याकडून व्यापारी संकुलाचे भाडे निश्चितीसंबधी नगर रचनाकार,बुलडाणा यांची मंजूरात प्राप्त करण्यासाठी पाठवावा लागेल असा अहवाल मिळकत व्यवस्थापकन.प.मलकापूर यांनी सादर केलेला आहे.त्यानुसार नगर रचनाकार,नगर परिषद मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार सर्व्हे नं.3 आरक्षण क्र.73 वरील छत्रपती शिवाजी महाराज बहुउद्देशिय सभागृह व व्यापारी संकुलाचे भाडेतत्वावर निश्चिती संबधी महाराष्ट्र नगर परिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 92 अन्वये राज्य शासनाच्या मंजूरी करीता प्रस्ताव तयार करुन पाठवावा लागेल असा अहवाल नगर रचनाकार,न.प.मलकापूर यांनी सादर केलेला आहे.असे मुख्याधिकारी नगर परिषद यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले.

वरील सर्वबाबींचा विचार करता न.प.मालकीच्या सर्व्हे नं.3 आरक्षण क्र.73 वरील छत्रपती शिवाजी महाराज सभागृह व व्यापारी संकुलाचे भाडेतत्वावर देण्यासाठीचा प्रस्ताव महाराष्ट्र नगर परिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 92 अन्वये राज्य शासनाच्या मंजूरी करीता प्रस्ताव तयार करुन पाठविण्यास ही सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.

विषय क्र 5.:- बुलडाणा रोडवरील व आठवडी बाजार मधील दुकान गाळयांची करारनाम्यातील अटीप्रमाणे व स्थायी निर्देशातील तरतुदीप्रमाणे भाडेवाढ करण्यास मान्यता देणे.

बुलडाणा रोडवरील व आठवडी बाजार मधील दुकान गाळयांची करारनाम्यातील अटीप्रमाणे व स्थायी निर्देशातील तरतुदीप्रमाणे भाडेवाढ करण्यास मान्यता देण्याबाबतच्या सहा.मिळकत व्यवस्थापक न.प. यांच्या विषयावरील मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,नगर परिषद मालकीचे बुलडाणा रोडवरील दुकान क.1 ते 39 (खालचा मजला)जिना क्र.1 , 2 व 3 सदर दुकानांचे न.प.मलकापूर जाहीर लिलाव सुचनेच्या अटी व शर्ती नुसार तसेच बुलडाणा रोडवरील वरचा मजल्यावरील दुकानांना न्यायालयाने स्टे दिलेले गाळे सोडून उर्वरीत गाळयांना अटी व शर्तीनुसार भाडेवाढ करण्यात यावी.

तसेच आठवडी बाजार 1 ला मजला टप्पा दुकान क्र.1 ते 29 व दुसरा टप्पा दुकान क्र.1 ते 29 व 2 जिने या दुकानाचे न.प.मलकापूर जाहीर लिलाव सुचनेच्या अटी व शर्तीनुसार सदर दुकाने भाडेपटटयावर देण्यात आलेली आहे.व दुकानांचे भाडे दर प्रत्येक 5 वर्षानी 5% भाडेवाढ करणे आवश्यक आहे.त्यानुसार सन 2001-2002 मध्ये प्रथम व सन



Scanned by Scanner Go

2012-2013 मध्ये दुसऱ्या वेळेस तसेच सन 2017-2018 मध्ये तिसऱ्या वेळेस असे एकूण 3 वेळेस प्रत्येकी 5% प्रमाणे अटी शर्तीनुसार दुकान भाडेवाढ करण्यात आली असून त्यानंतर 5 वर्षाचा कालावधी पूर्ण झालेला असल्याने सन 2022-2023 मध्ये एप्रिल 2022 पासून 5% भाडेवाढ करणे गरजेचे आहे.असे सहाय्यक मिळकत व्यवस्थापक यांनी अहवालात नमुद केले आहे.त्यानुसार मा.मुख्याधिकारी यांनी सदर बाबत सभेच्या निदर्शनास आणून दिली.

वरील सर्वबाबींचा विचार करता सहाय्यक मिळकत व्यवस्थापक,नगर परिषद मलकापूर यांचे अहवालानुसार कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

विषय क्र 6. :- मा.आमदार स्थानिक विकास निधीमधून प्राप्त रुग्णवाहिकेवर तात्पुरत्या स्वरुपात नेमण्यात आलेल्या चालकांकडून करुन घेण्यात आलेल्या कामास कार्योत्तर मंजूरात देणे.

मा.आमदार स्थानिक विकास निधीमधून प्राप्त रुग्णवाहिकेवर तात्पुरत्या स्वरुपात नेमण्यात आलेल्या चालकांकडून वाहन चालविण्याचे काम करुन घेण्यात आलेल्या कामास कार्योत्तर मंजूरात देण्याबाबतच्या विषयावरील मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, मा.आमदार स्थानिकविकास कार्यक्रम अंतर्गत सन 2020-2021 अंतर्गत निधीतून नगर परिषद मलकापूर करीता रुग्णवाहीका प्राप्त झालेली आहे.प्राप्त रुग्णवाहिका चालविण्यास देणेबाबतचे निकष ठरविण्याकरीता सर्वसाधारण सभा ठराव क्र.10 दिनांक 24/06/2021 नुसार मान्यता प्राप्त झालेली आहे.सदर ठरावानुसार RTO यांचे कार्यालयाकडून दरपत्रक घेऊन रुग्णवाहिकेची नोंदणी झाल्या नंतर पुढील कार्यवाही करण्याचे सभेमध्ये चर्चेअंती ठरविण्यात आले.

उपरोक्त सर्व प्रक्रिया पुर्ण होईपर्यत तात्पुरत्या स्वरुपात रुग्णवाहिका चालकाची नियुक्ती करण्याबाबत निवीदा प्रक्रिया करण्यात आली होती.यामध्ये इंधन पुरवठा न.प.मार्फत करण्यात येईल.व फक्त रुग्णवाहिका चालविण्याबाबत श्री.प्रमोद राखोंडे यांची दरमाह 10,500/- कमी दराच्या निवीदेस स्थायी समिती सभा ठराव क्रमांक 2 दिनांक 30/08/2021 नुसार मान्यता देण्यात आली आहे.त्यानुसार श्री.प्रमोद राखोंडे हे रुग्णवाहिकेवर काम करीत आहेत.

सदर रुग्णवाहिका सामाजिक / स्वयंसेवी संस्थेस चालविण्यास देणेबाबतची प्रक्रिया अदयाप प्रलंबीत असल्याने श्री.प्रमोद राखोंडे यांचेकडून रुग्णवाहिका चालविण्याचे काम करुन घेण्यात येत आहे.



Scanned by Scanner Go

श्री.प्रमोद राखोंडे यांनी सादर केलेल्या निवीदेतील दरपत्रकात नमुद दरानुसार त्यांचेकडून रुग्णवाहिका चालविण्याचे काम करुन घेण्यात येत आहे.तरी त्यांनी केलेल्या कामास कार्योत्तर मुदतवाढीची आवश्यकता आहे.श्री.प्रमोद राखोंडे,रुग्णवाहिका चालक (तात्पुरते) यांनी केलेल्या व करत असलेल्या कामास तसेच सदर रुग्णवाहिका सामाजिक / स्वयंसेवी संस्थेस चालविण्यास देणेबाबतची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मान्यता देण्याबाबतचा अहवाल आरोग्य निरीक्षक,न.प.मलकापूर यांनी सादर केल्याबाबत मा.मुख्याधिकारी यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले.

वरील सर्वबाबींचा विचार करता श्री.प्रमोद राखोंडे,रुग्णवाहिका चालक (तात्पुरते) यांनी केलेल्या वाहन चालकाचे कामास कार्योत्तर मान्यता देत आहे.तसेच रुग्णवाहिका चालविण्याच्या कामास निवीदेत सादर केलेल्या व स्थायी समिती सभा ठराव क्रमांक 2 दिनांक 30/08/2021 नुसार मंजूर केलेल्या दरानुसार यापुढे काम करण्यास तयार असल्यास त्यास हि सभा मुदवाढ देण्यास मान्यता देत आहे.

विषय क्र 7. :- आयकर/वस्तु व सेवा कराचे TDS भरणा करीता C/A CS ची नियुक्ती करणे बाबत निर्णय घेणे

आयकर/वस्तु व सेवा कराचे TDS भरणा करीता C/A CS ची नियुक्ती करणे बाबतच्या लेखापाल यांच्या विषयावरील मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,दरवर्षीप्रमाणे आर्थिक वर्ष 2022-2023 चे कर्मचाऱ्यांचे वेतनातुन कपात आयकर,टीडीएस व त्रयस्थ बीलातून कपात आयकर व जी.एस.टी,डी.एस शासनखाती भरणे गरजेचे आहे.त्याकरीता न.प. कार्यालय सनदी लेखापाल यांचे नियुक्ती करत असते.सदर नियुक्ती निवीदा प्रक्रियाद्वारे होत असून याकरीता येणारा खर्च हा नगर परिषद निधीतून करण्यात येतो. सदर नियुक्तीकरीता व होणाऱ्या खर्चास सर्वसाधारण सभेच्या प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता असल्याचे लेखापाल न.प.यांनी अहवालात नमुद केल्याचे मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले.

वरील सर्वबाबींचा विचार करता नगर परिषदेच्या सन 2022-23 करीता सनदी लेखापाल निवीदा प्रक्रियेद्वारे नियुक्त करण्यास व येणारा खर्च नगर परिषद निधीतून करण्यास हि सभा मान्यता देत आहे.



Scanned by Scanner Go

विषय क्र ४. :- दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीवीका अभियान अंतर्गत महिला बचत गटाने तयार केलेल्या उत्पादित वस्तुंच्या विक्रीसाठी तसेच शहरातील बेरोजगार कारागीर/कामगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी शहर उपजीवीका केंद्र न.प.च्या जागेवर सुरु करण्याबाबत निर्णय घेणे.

वरील विषयाची प्रकल्प अधिकारी यांच्या विषयावरील मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीवीका अभियान अंतर्गत महिला बचत गटाने तयार केलेल्या उत्पादित वस्तुंच्या विक्रीसाठी तसेच शहरातील बेरोजगार कारागीर/कामगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी शहर शहर स्तरावर शहर उपजीवीका केंद्र (CLC) न.प.च्या जागेवर सुरु करणे आवश्यक आहे.जेणे करुन अभियानाच्या माध्यमातुन नागरी दारिद्रय रेषेखालील महिला बचत गटांनी निर्माण केलेल्या उत्पादित वस्तू व सेवा पुरविणे तसेच विपणन माहिती देणे तसेच शहरातील बेरोजगार कारागीर/कामगारांना त्यांच्या कौशल्यनुरुप रोजगार उपलब्ध करुन देणे इत्यादी सेवा शहर उपजीवीका केंद्रामार्फत दिल्या जाणार आहेत.स्थानिक महिला बचत गटांनी तयार केलेल्या मालला हक्काची बाजारपेट या निमिताने मिळणार आहे.तसेच शहरातील गरजवंत नागरिकांना आवश्यक असलेली वस्तु व सेवा तत्पर वेळेच्या आत उपलब्ध होणार आहे.सबब या उपजीवीका केंद्रासाठी नगर परिषद शाळा,मुक्ताई नगर रोड,मलकापूर येथील वापरण्यास योग्य असलेल्या 2 खोल्या दिनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीवीका अभियान अंतर्गत शहर उपजीवीका केंद्र करीता देण्यास हरकत नसल्याचा अहवाल दिला आहे.

सदर इमारतीमध्ये शहर उपजीवीका केंद्र (CLC) सुरु करण्याच्या मंजुरीसोबत इमारतीची डागडुजी,रंगरंगोटी विदयुत जोडणी करणे करीता तसेच सदर खर्च नगर परिषद निधीतून करण्यात यावा.असा अहवाल शहर अभियांन व्यवस्थापक,दिनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीवीका अभियान (प्रकल्प विभाग) यांच्या विषयावरील मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

वरील सर्वबाबींचा विचार करता दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीवीका अभियान अंतर्गत मलकापूर शहरामध्ये शहर उपजीवीका केंद्र सुरु



Scanned by Scanner Go

करण्यासाठी नगर परिषद शाळा,मुक्ताईनरोड,मलकापूर येथील वापरण्यास योग्य असलेल्या 2 खोल्या (1000 चौ. फुट जागा) देण्यात येत आहे.तसेच सदर इमारती डागडुजी,रंगरंगोटी,विदयुत जोडणी करणेसमंजूरी देण्यात येत आहे.सदर खर्च नगर परिषद निधीतून करण्यात यावा करीता प्रशासकीय ठराव मंजूर करण्यात येत आहे.

आर यु सुरडकर
प्रशासक
नगरपरिषद मलकापूर



Scanned by Scanner Go